प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १७.०८.२०२६

मनमोहन राजपुत, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती, साक्री यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम शासकिय ठेकेदार रोहन देवरे यांचे हस्ते स्विकारल्याने गुन्हा

अ.क्र.	शिर्षक	तपशिल
१	घटक	धुळे
२	तक्रारदार	पुरुष, वय ५४ वर्षे,
३	आरोपी	१. मनमोहन विजयसिंग राजपुत, वय ३० वर्षे, ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती, साक्री, रा. प्लॉट नं. ९९, पाटील नगर, वाडीभोकर रोड, देवपुर, धुळे, २. रोहन रोहिदास देवरे, वय ३१ वर्षे, व्यवसाय शासकिय ठेकेदार, रा. प्लॉट नं. ३७, गोपाळनगर, साक्री, जि. धुळे,
४	तक्रार	तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांना मौजे जामदे येथे पंचायत समिती, साक्री यांचेकडुन शबरी आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाले असुन घरकुलाच्या अनुदानाची काही रक्कम त्यांना मिळाल्यावर त्यांनी घरकुलाचे बांधकाम सूरु केले होते. सुमारे एक महिन्यापुर्वी मनमोहन राजपुत, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी अनुदानाचे काही हप्ते अदा केल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडुन प्रत्येक घरकुल धारकाचे ५,०००/- रुपये याप्रमाणे २५,०००/- रुपये स्विकारले होंते. त्यानंतर तक्रारदार यांनी घरकुल धारकांच्या उर्वरीत अनुदानाच्या रकमेची चौकशी करण्याकरीता दि.१३.०८.२०२६ रोजी साक्री पंचायत समिती कार्यालयात जावुन मनमोहन राजपुत यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि.१७.०८.२०२६ रोजी तक्रार दिली होती.
५	तक्रारीची पडताळणी	सदर तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता मनमोहन राजपुत, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी तक्रारदार व त्यांच्या नातेवाईकांच्या घरकुलाचे उर्वरीत अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.
६	सापळा कार्यवाही	सापळा कारवाई दरम्यान मनमोहन राजपुत यांनी शासकिय ठेकेदार रोहन देवरे यांचे हस्ते सदर लाचेची रक्कम साक्री शहराचे धुळे रोडवरील शेवाळी फाटयाजवळ पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आल्याने गुन्हा
७	गु.र.नं., कलम/ पो.स्टे./ जिल्हा, दिनांक व वेळ	साक्री पो.स्टे., जि. धुळे येथे भ्र.प्र.का.कलम ७ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
८	आरोपी अटक दिनांक व वेळ	आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे.
९	सापळा अधिकारी	पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे
१०	पर्यवेक्षक व तपास अधिकारी	सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे
११	सापळा पथक	यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, पोकॉ. प्रशांत बागुल, मकरंद पाटील, प्रितेश चौधरी, पोहेकॉ. सुधीर मोरे
१२	मार्गदर्शन	श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, मो. नं.८८८८८३२१४६ श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक मो.नं.९६७३९८८००० श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, मो.नं.८१४९८३४४६५ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

संपर्क पत्ता	घटक कार्यालय	परिक्षेत्रिय कार्यालय	ला.प्र.वि. मुख्यालय
पत्ता	ला.प्र.विभाग, धुळे संतोषी माता मंदिराजवळ, शिवतिर्थ, धुळे	ला.प्र.विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, तिबेटियन मार्केट, मनपा, भाजीपाला मार्केटचे वर, शरणपुर रोड, नाशिक	ला.प्र.विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई
दुरध्वनी क्र., व्हॉटसॲप क्र.	०२५६२-२३४०२० १०६४ ७७९८१६१०६४	०२५३-२५७५६२८	०२२-२४९२१२१२
इमेल आयडी	dyspacbdhule@gmail.com	spacbnasik@gmail.com	acbwebmail.mahapolice.gov.in

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे,